# कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण

## अग्निशमन व आणिबाणी सेवा

जा.क्र.कडोंमपा/अग्नि/मुका/ ९६७९ /२०२३–२४ दिनांक : १७/०६/२०२३

**प्रति,**
सचिव
क्रांतीदेवता सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था संचलित
''सेंट थॉमस स्कुल ''
रूंदे, ता. कल्याण, जि. ठाणे – ४२१६०५.

**विषय** : रूंदे, ता. कल्याण, जि. ठाणे येथील '' सेंट थॉमस स्कुल '' करीता अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय.

**संदर्भ** : १. क्रांतीदेवता सावित्रीबाई फुले शिक्षण संस्था संचलित, ''सेंट थॉमस स्कुल'' यांचा दि. १२/०६/२०२३ रोजीचा अर्ज.
२. जा.क्र.शिउसं/माध्य–४/स्वअशा/१६–१७/२०१६/१९०२९/१३९ दि. २४/०६/२०१६ शाळा परवानगी आदेश.

वरील संदर्भिय विषयान्वये शैक्षणिक **रूंदे, ता. कल्याण, जि. ठाणे येथील '' सेंट थॉमस स्कुल ''** करीता खालील अटी व शर्तीचे अधिन राहून अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय देण्यात येत आहे.

१. सदरहू अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय एन.बी.सी. २००५, कडोंमपा डी.सी. नियम व महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ च्या अधिन राहून देण्यात येत आहे.
२. अग्निशमन विभाग यांनी तपासणी केली असता शैक्षणिक इमारती करीता अग्निशमन उपकरणे बसविण्यात आलेली आहे.
३. सदर शैक्षणिक इमारतीमधील अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वित ठेवण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन यांची आहे.
४. अग्निशमन यंत्रणेची माहिती तिचा आपद् प्रसंगी वापर, देखभाल, याबाबत शाळेमधील कर्मचारी/शिक्षक/व्यवस्थापक यांना नियमित आवश्यक प्रशिक्षण देण्यात यावे.
५. स्टेअरकेस, बाहेर जाण्याचे मार्ग इत्यादी ठळकपणे दिसतील असे साईनबोर्ड लावावेत.
६. शैक्षणिक इमारतीच्या बांधकामामध्ये कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करून नये. तसे केल्याचे आढळून आल्यास सदरचा अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय रदद् झाले असे समजण्यात येईल.
७. अग्निशमन वाहन इमारतीच्या जवळ येण्याजाण्याकरीताचा मार्ग खुला/मोकळा ठेवण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन यांचेवर राहील.
८. शाळेमध्ये ज्वलनशिल पदार्थ/विस्फोटक यांचा साठा करू नये. तसेच एल.पी.जी. चा वापर करण्यात येवू नये.
९. अग्नि सुरक्षा व बचाव कार्यासाठी फायर एक्झीट ड्रील/इव्हॅक्युएशन ड्रील करून घेण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन यांची आहे.
१०. वेळोवेळी अग्निशमन विभागास तपासणीसाठी सहकार्य करावे.
११. ४५ पेक्षा विद्यार्थी एका वर्गामध्ये असल्यास त्या वर्गामध्ये दोन दरवाजे असणे बंधनकारक राहील.

१२. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ व नियम २००९ अन्वये वर्षातून दोनदा जानेवारी व जुलै महिन्यामध्ये अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व कार्यान्वीत असल्याबाबतचे 'ब' प्रमाणपत्र लायसन्स अभिकरणाकडून घेवून अग्निशमन विभागाकडे सादर करणे व सदरहू अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय दरवर्षी नुतनीकरण करून घेणे शाळा व्यवस्थापन यांना कायद्याने बंधनकारक आहे.

१३. सदरहू अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय हा दिलेल्या तारखेपासून एक वर्ष कालावधी करीताच वैद्य राहील.

१४. नुतनीकरण करताना त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमांच्या व नियोजित आरखडा अनुषंगाने छाननी करण्यात येईल.

पावती क्र. ८४६५८ दि. १६/०६/२०२३ अन्वये रु. ५०००/- अग्निशमन ना हरकत दाखला/अभिप्राय फि भरण्यात आलेली आहे.

नामनिर्देशित अधिकारी
अग्निशमन व आणिबाणी सेवा
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
कल्याण.

Scanned with OKEN Scanner